गाळ काढण्यासाठी तहसीलदारांना निवेदन

मुरुड जंजिरा : उसरोली वालवट नदीमधील गाळ काढून मिळण्यासाठी ग्रामपंचायत सरपंच मनीष नांदगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांनी शुक्रवारी मुरुड तहसीलदार रोहन शिंदे यांची भेट घेऊन तातडीने गाळ काढून मिळावा, अशी मागणी केली आहे. मागील वर्षी सर्वात जास्त पाऊस मुरुड तालुक्यात पडला आहे. त्यामुळे डोंगरातून वाहून आलेली माती नदीच्या तळाशी जाऊन बसली आहे. त्यामुळे नदीमधील गाळ काढला नाही तर उसरोली ग्रामपंचायत हद्दीमधील खारीकवाडा, खार दौडकुले, उसरोली गावाला मोठा धोका निर्माण होणार आहे.

थो | ड | क्या | त
महत्त्वाचे

संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीची सभा

कर्जत : कर्जत तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीची यंदाची पहिली सभा संपन्न झाली. या सभेत ३२ लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले. हे सर्व अर्ज ग्रामीण भागातील होते. तालुक्यातील जास्तीत जास्त लाभार्थींना लाभ मिळावा. यासाठी सर्व सदस्यांनी प्रयत्न करावा असे सूचित करण्यात आले. कर्जतच्या तहसीलदारांच्या दालनात संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. तहसीलदार देशमुख यांनी सदस्यांना या योजनेबद्दलची माहिती सांगितली. त्यानंतर मागील प्रस्तावित अर्ज सभेपुढे ठेवण्यात आले. हे सर्व अर्जामध्ये आवश्यक कागदपत्रे असल्याने सर्वच्या सर्व ३२ अर्जांना मंजुरी देण्यात आली.

शिवसैनिकांचा राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश

श्रीवर्धन : भावनेच्या आधारावर चालणाऱ्या पक्षावर वर्षानुवर्षे विसंबून राहिल्यामुळे गावचा विकास खुंटला आहे. मतदार संघात २०-२५ वर्षांपासून रखडलेला विकास जणू काही आकाशच फाटले होत; मात्र थोडी थोडी ठिगळे लावत विकास करत असताना परिवर्तनाची राजकीय लाट येत आसल्याचे वक्तव्य खासदार सुनील तटकरे यांनी केले. निगडी काठी सामाजिक सभागृह भूमिपूजन, केलेवाडी, मोहिते वाडी रस्त्याचे उदघाटन, गडबवाडी विठ्ठल रुक्मिणी मंदिर जीर्णोद्धाराप्रसंगी ते बोलत होते. यावेळी निगडी काठी, बागमांडला रामवाडी येथील शिवसैनिकांनी राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला.

पाच ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुका जाहीर

मुरूड : राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार राज्यातील ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणूका जाहीर झाल्या असून रायगड जिल्ह्यात १२३ ग्रामपंचायतीच्या १७२ जागांसाठी निवडणूक होत असून यात मुरुड तालुक्यातील वावडुंगी, सावली, राजपुरी, एकदरा व चोरढे पाच ग्रामपंचायतीत रिक्त झालेल्या पदांसाठी ५ जून २०२२ रोजी मतदान होणार असल्याचे व पोटनिवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याची माहिती निवडणूक नायब तहसीलदार अमित पुरी यांनी दिली. वावडुंगी-१, सावली-१, राजपुरी-४, एकदरा-८ व चोरढे-१ या पाच ग्रामपंचायतीत रिक्त झालेल्या एकूण १५ पदांसाठी पोटनिवडणूक होत आहे.

बॅटरी बसेसच्या स्वागतासाठी पालिका सरसावली

चार्जिंगसाठी ३० स्टेशन्स उभारणार

विशेष प्रतिनिधी/ठाणे

पेट्रोल, डिझेलवर चालणाऱ्या वाहनांमुळे शहरात मोठ्या प्रमाणात वायुप्रदूषण होत असल्याचे वेळोवेळी उघड होऊ लागले आहे. दुसरीकडे प्रदूषणाचे प्रमाण कमी व्हावे आणि पर्यावरणाचे रक्षण मोठ्या प्रमाणात व्हावे, यासाठी बॅटरीवर चालणाऱ्या वाहनांना प्रोत्साहन देण्याचे धोरण गेल्या काही वर्षांपासून केंद्र सरकारने अंगीकारले आहे. याचअंतर्गत नामांकित वाहन कंपन्यांनी बॅटरीवर चालणाऱ्या गाड्यांचे उत्पादन करण्यास सुरुवात केल्याने आणि पेट्रोल डिझेलचे भाव दिवसेंदिवस वाढत असल्याने आगामी काळात बॅटरीवरील गाड्यांची खरेदी मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बॅटरीवर चालणाऱ्या गाड्यांसाठी चार्जिंग स्टेशन्स उभारण्याचा निर्णय पालिकेने घेतला असून पहिल्या टप्प्यात पीपीपी तत्त्वावर ३० स्टेशन्स उभारण्यात येणार आहेत.

केंद्र सरकारने २०३०पर्यंत 'इलेक्ट्रिक व्हेइकल नेशन' घडविण्याचा निर्धार केला असून 'नॅशनल इलेक्ट्रिक मोबिलिटी प्लॅन' तयार केला आहे. या उपक्रमांतर्गत इलेक्ट्रिक वाहनांची निर्मिती करण्यासाठी उद्योगांना आणि अशी वाहने वापरण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित करण्यात येत आहे. याचअंतर्गत ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवेसाठी पालिकेने पीपीपी तत्त्वावर या इलेक्ट्रिकल बस सेवेत सामावून घेण्याचे नियोजन होते. मात्र ते बारगळल्याचे उघड झाले आहे. विशेष म्हणजे इतर बसगाड्यांच्या तुलनेत या इलेक्ट्रिक बसला कमी देखभालीची आवश्यकता लागते.

येत्या काही महिन्यात एमएमआरडीएकडून इलेक्ट्रिक तसेच केंद्र सरकारच्या हरित योजनेतून इलेक्ट्रिक बसेस शहरात धावतील, असा दावा करण्यात येत असल्याने या बसेसच्या चार्जिंगसाठीही या चार्जिंग स्टेशनचा उपयोग होणार आहे. शहरातील प्रदूषण रोखण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांचा मोठा हातभार लागणार असून बहुतांशी नामांकित वाहन उद्योगांनी बॅटरीवर चालणाऱ्या दुचाकी, तीनचाकी आणि चारचाकी वाहनांच्या निर्मितीस प्रारंभ केला आहे. तशी काही वाहने मार्केटमध्ये विक्रीसाठी उपलब्ध असून आता नागरिकांचा अशी वाहने खरेदी करण्याकडे मोठा ओढा आहे. सध्या अशा वाहनांचे प्रमाण कमी असल्याने घरीच बॅटरी चार्जिंग करण्याशिवाय नागरिकांना दुसरा पर्याय उपलब्ध नाही. मात्र येत्या काही वर्षात अशी वाहने वाढल्यास बाहेरून शहरात येणारी वाहने तसेच शहरातील वाहने यांच्या बॅटऱ्या चार्जिंग करण्यासाठी चार्जिंग स्टेशनची आवश्यकता लागणार आहे.

खासगी ठेकेदारांद्वारे चार्जिंग स्टेशनची उभारणी

पीपीपी अर्थात खासगी भागीदारीच्या योजनेतून चार्जिंग स्टेशन्स उभारण्यात येणार असून त्यासाठी येणारा सर्व भांडवली खर्च ठेकेदार कंपनीला करावा लागणार आहे. चार्जिंग स्टेशन्ससाठी लागणारा वीजपुरवठा, इंटरनेट सेवा, पाण्याची बिले याचा खर्चही ठेकेदाराला करावा लागणार आहे. त्यांना महापालिका चार्जिंग स्टेशन्ससाठी निश्चित केलेली जागा निविदेच्या दरानुसार उपलब्ध करून देईल. या प्रकल्पासाठी लागणाऱ्या राज्य आणि केंद्र सरकारच्या मंजुऱ्या मिळवण्यासाठी आवश्यक ते सहकार्य महापालिका प्रशासन करणार आहे.

शिक्षण विभागाच्या परिपत्रकाला केराची टोपली

शाळा प्रशासनाकडून पालकांकडून सक्तीची फीवसुली

प्रतिनिधी/ठाणे

कोरोना काळात रोडावलेल्या आर्थिक स्थितीमुळे सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असताना ठाण्यातील अनेक शाळांनी यंदाही फी वाढ करत एकरकमी फी भरण्याचा आग्रह पालकांकडे धरला आहे. याबाबत ठाणे पालिकेच्या शिक्षण विभागाने परिपत्रक काढत सर्वच खासगी शाळांना यंदादेखील पालकांकडून फी टप्प्याटप्प्याने घेण्याचे निर्देश दिले आहेत; मात्र तरीही अनेक शाळांनी पालकांकडून जाचक पद्धतीने वर्षाची संपूर्ण फी एकदाच उकळली असून ही लूट थांबवली नाही तर तीव्र आंदोलनाचा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने दिला आहे.

गेली दोन वर्षे लॉकडाऊनमध्ये शाळा बंद होत्या. या काळात ऑनलाईन वर्ग सुरू होते. मात्र तरीही अनेक खासगी शाळांनी जाचक पद्धतीने फीवसुलीसाठी तगादा लावला होता. अनेक शाळांनी पहिली ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची फी वाढ यंदा शैक्षणिक वर्षात केली. कोरोना काळात घर चालवण्यासाठी तारेवरची कसरत सुरू असताना वाढीव फी

भरणे पालकांना शक्य नसल्याने त्यांनी याप्रश्नी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे ठाणे जिल्हाध्यक्ष संदीप पाचंगे यांनी शिक्षण विभागाला निवेदन दिले होते.

परिपत्रक पालकांपर्यंत पोहोचण्यात विलंब

यंदाच्या मार्च महिन्यात ठाणे महापालिकेच्या शिक्षण विभागाने जारी केले आहे. मात्र या परिपत्रकाचा आदेश सर्वसामान्य पालकांपर्यंत पोहचलाच नाही. अनेक शाळांनी हे परिपत्रक दडवून त्यांची आर्थिक गणित सोडवण्यात धन्यता मानल्याची माहिती संदीप पाचंगे यांनी दिली.

मोखाड्यातील मुकुंदपाड्याच्या रस्त्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवू

खासदार राजेंद्र गावित यांचे आश्वासन

वार्ताहर/जव्हार

मोखाडा तालुक्यापासून ३५ ते ४० किमी अंतरावर अतिदुर्गम व दरीडोंगरात वसलेल्या आणि सोयीसुविधा, विकासापासून वंचित असलेल्या मुकुंदपाड्यातील दुर्गा मनोहर भोये या १९ वर्षीय गरोदर मातेला रस्त्याअभावी ४ ते ५ किमीचा डोंगर पार करावा लागल्याची धक्कादायक घटना काही दिवसापूर्वी घडली होती. हे भयाण वास्तव चव्हाट्यावर आल्यानंतर खासदार राजेंद्र गावित यांनी याची दखल घेतली असून केंद्रातून येथील रस्त्यासाठी व तसेच पुलासाठी निधी मंजूर करून येथील हा ज्वलंत प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावू, असे आश्वासन दिले आहे.

"आमच्याकडे रस्त्याची सोय नाही. आजारी रुग्णांना लाकडाची डोली करून ८ किमीचा डोंगर पार करून दवाखाना गाठावा लागतो. गंभीर रुग्ण रस्त्यातच दगावतात. पावसाळ्यात आमची समस्या अधिकच बिकट बनते. तालुक्याशी संपर्क तुटून जातो. रेशन आणायला आम्हाला नदीतून जीवाची बाजी लावून जावे लागते," असे येथील स्थानिक आदिवासी गणपत पांडू भोये यांनी सांगितले. तसेच येथे वीज सोडली तर पाणी, रस्ता, आरोग्य अशा कोणत्याच सुविधा नाहीत. पावसाळ्यात तर या पाड्याचा संपर्कच तालुक्याशी राहत नाही. केंद्र सरकार 'मेक इन इंडिया', 'डिजिटल इंडिया'चा डंका पिटत असला तरी या योजना कुठे आहेत, असा सवाल येथील ग्रामस्थांकडून उपस्थित होत आहे.

१२४ आदिवासी लोकवस्तीच्या मुकुंदपाड्यावर सोयीसुविधांचा अभाव आहे. येथे मिनी अंगणवाडी आहे परंतु ती बंदच असते. शाळाही गेल्या पाच सहा वर्षांपासून बंद आहेत. पाण्याची सोय नाही. त्यामुळे बारमाही नदीवरून खड्डा खोदून पाणी आणावे लागते.

माथेरानमध्ये ई-रिक्षाला सुप्रीम कोर्टाचा हिरवा कंदील

वार्ताहर/कर्जत

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार माथेरानमध्ये ई-रिक्षा सुरू करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. त्यासाठी ई-रिक्षा श्रमिक संघटनेचे सचिव, सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे यांनी पाठपुरावा केला होता. १० वर्षे सतत वेगवेगळ्या न्यायालयात केलेल्या पाठपुरावा याला यश आले असून प्रायोगिक तत्त्वावर माथेरान मध्ये ई-रिक्षा चालविण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे. लवकरच ई-रिक्षाची चाचणी होणार आहे. हातरिक्षा ओढण्याच्या अमानवीय कृतीतून आता कामगारांची सुटका होणार असून वृद्ध पर्यटक तसेच विद्यार्थी यांच्यासाठी ई-रिक्षा वरदान ठरणार आहे.

माथेरान हे मुंबई, पुण्यापासून अगदी जवळचे असल्याने पर्यटक मोठ्या प्रमाणात भेट देत असतात. माथेरान मध्ये दिवसाला ३ हजार पर्यटक येत असतात. काही पर्यटकांना घोडे आणि हातरिक्षाचा दर परवडत नसल्यामुळे नाईलाजास्तव चालत जावे लागते. त्यात आता नवीन पर्याय म्हणून ई-रिक्षाची मागणी जोर धरू लागली होती. याबाबत माथेरानच्या देखरेख समितीला चाचणी घेण्याबाबत न्यायालयाकडून सांगण्यात आले. पुढील काही दिवसात तीन वेगवेगळ्या प्रकारच्या ई-रिक्षाची चाचणी घेतली जाणार आहे. ही चाचणी यशस्वी झाली तर पर्यटकाची ससेहोलपट दूर होऊन पर्यटकांना नवा प्रवास पर्याय होऊ शकतो. यामुळे पर्यटकांचा वेळ आणि पैशाचीसुद्धा बचत होणार आहे.

विद्यार्थ्यांना ई-रिक्षाचा मोठा दिलासा.....

माथेरानमधील विद्यार्थी पाटीवर दप्तर घेऊन तीन किलोमीटर पायपीट करत असतात. आदिवासी गावातील विद्यार्थी तर सहा किलोमीटर चालत येतात. या ई-रिक्षांमुळे त्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

काशिमीरातील ऑर्केस्ट्रा बारवर धाडी

भाईंदर : अश्लील नाचगाणी केल्याप्रकरणी काशिमीरा पोलिसांनी महामार्गावरील २ ऑर्केस्ट्रा बारवर धाडी टाकून ३६ जणांना ताब्यात घेतले आहे.

काशिमीरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजय हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे हद्दीतील ऑर्केस्ट्रा बारमधील अनैतिक, अश्लील

प्रकारांविरुद्ध या धाडी टाकण्यात आल्या आहेत. मुंबई-अहमदाबाद महामार्गावर मीरा गावठाण येथे असलेल्या मॅडनेस सिटी ऑर्केस्ट्रा बारवर बुधवारी रात्री धाड टाकण्यात आली. त्या धाडीत ९ बार कर्मचारी व ६ गिऱ्हाईक यांना पकडण्यात आले. बारमध्ये महिलांकडून अश्लील नाच करवून घेतले जात असल्याने या प्रकरणी गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच मिलेनियम २००० ह्या ऑर्केस्ट्रा बारवर धाड टाकत बारमालक विशवनाथ शेट्टी, चालक नितीन शेट्टी तसेच ६ कर्मचारी, ७ बारबाला व ८ ग्राहकांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

दुष्काळातही अखेरच्या मोसमात आर्थिक आशेचा किरण मिळाला

एकदरातील मच्छीमारांना कोलंबीचा जॅकपॉट

संतोष रांजणकर/मुरूड

यावर्षी संपूर्ण मोसमात मासळीच्या दुष्काळामुळे राज्यभरातील मच्छीमारांपुढे संकट ओढवले असतानाच मुरूड तालुक्यातील ७० टक्के मोठ्या नौका १ जूनपूर्वीच किनाऱ्यावर लॉकडाऊन करण्यात आल्या आहेत. मात्र मोसमाच्या अखेरीस जाळ्यात मासळी गावेल, या अपेक्षेने एकदरा येथील ३० टक्के छोट्या नौका किनाऱ्याजवळच उथळ समुद्रात जात असतात. त्यांची ही अपेक्षा पूर्ण झाली असून पदमजलदुर्ग परिसरात मोठ्या प्रमाणात कोलंबी मिळू लागल्याने दुष्काळात आर्थिक आशेचा मोठा किरण मच्छीमारांना गवसला आहे.

"मासळीच्या दुष्काळाने होरपळलेल्या छोट्या मच्छीमारांना कोलंबी मोठ्या प्रमाणात मिळू लागल्याने एकप्रकारे अचानक जॅकपॉटच लागला आहे. गेल्या ४ ते ५ दिवसांपासून एकदरा येथील ३० ते ४० छोट्या २ सिलेंडर्सवाल्या नौका दिवसात २ ते ३ वेळा कोलंबीच्या मासेमारीस जाताना दिसून येत आहेत. कोलंबी, मांदेली अशी छोटी मासळी मिळत असल्याने कोलंबीचे सोडे काढण्यासाठी कोळी भगिनींची मोठी लगबग सुरू आहे," असे एकदरा महादेव कोळी सामाजिक अध्यक्ष पांडुरंग आगरकर, मुरूड महादेव कोळी समाज अध्यक्ष आणि रायगड मच्छीमार कृती समितीचे अध्यक्ष मनोहर बैले यांनी सांगितले.

रावस, सुरमई, घोळ, कुपा, पापलेट, पाला अशी मासळी समुद्रात मिळेनाशी झाल्याने सहा सिलेंडर्सवाल्या मोठ्या नौका मे महिन्याच्या सुरुवातीला किनाऱ्यावर शाकारून ठेवल्या आहेत. गेल्या ३ ते ४ वर्षांत मासळीच्या दुष्काळाचे हे संकट यावर्षी आधिक गडद झाल्याने मच्छीमार मोठ्या प्रमाणात होरपळला आहे. अशा कठीण परिस्थितीमध्ये शासनाने मच्छीमारांच्या पाठीमागे ठामपणे उभे राहावे, अशी मागणी होत आहे. सध्या कोलंबी मोठया प्रमाणात मिळत असल्याने कातळावर सुकविलेल्या सोड्यांना चांगली मागणी आहे. सोड्याचा भाव सध्या १७०० रुपये असला तरी मोठ्या प्रमाणात सोडे बाजारात आल्यानंतर हा भाव आवाक्यात येणार आहे. तसेच टायनी आणि चैती प्रकारातील कोळंबी १ किलोप्रमाणे २०० ते ३०० रुपयांना विकली जात आहे.

राजपुरी जवळा बाजारात

मुरूडपासून ४ किमी अंतरावर असणाऱ्या राजपुरी येथील समुद्रकिनारी कोलीम म्हणजे जवळा येत असून मुरूडच्या मार्केट ५० रुपयाला दोन वाटेप्रमाणे त्याची विक्री होत आहे. राजपुरी येथील जवळा खूप चविष्ट असल्याने मागणी वाढती आहे. फ्राय जवळा रेसिपी ही ग्रामीण भागात लोकप्रिय असून आता पुणे, मुंबईतील पर्यटकांच्या पसंतीस हळूहळू उतरू लागली आहे.

TENDERS
REPAIR WORK OF COLLEGE BUILDING & AUDITORIUM

Applications are invited from experience contractors for College Building & Auditorium Repair Work

1) Electric Work - College Main Building
2) Electric Work - College Auditorium
3) Sound & Lights - College Auditorium
4) Seating arrangement - Chairs for College Auditorium
5) Painting & Polish - College Auditorium

Sealed envelopes of tender to be submitted by or before 4.00 pm on 19/05/2022.

Any claimant requiring documents pertaining to the above scope of work may contact Admin Office on 17/05/2022 between 9.30 am to 4.00 pm.

Sind Educationists Association'
Jai Hind College Bldg, A Road, Churchgate West, Mumbai-20.
Email: vinayak.pange@jaihindcollege.edu.in

The Management reserves the right to accept the tender of the contractor based on the financial, technical and quality of the work executed / ongoing work or reject the tender at its discretion without any justification.

CANARA ROBECO

Canara Robeco Asset Management Company Ltd.
Construction House, 4th Floor, 5, Walchand Hirachand Marg, Ballard Estate, Mumbai 400 001.
Tel.: 66585000 Fax: 66585012 / 13

SALE OF RESIDENTIAL FLAT

Notice is hereby given that Canara Robeco Asset Management Company Limited ("the Company") offers to sell the following residential flat owned by the Company:

Flat No.	Built-up Area/Flat	Reserve Price for Flat + Covered Parking	Address
204	1000 Sq. Ft. (2 BHK) with Covered Parking	₹ 2,55,00,000/-	A-Wing, Abhar, Behind Sanjeev Enclave, Seven Bungalows, Versova, Andheri (W), Mumbai - 61

Sealed bids are invited from the intending buyers (individuals/institutions/corporates) on the terms & conditions, inter-alia, the following:

1. Bidders are advised to download and read the "**Offer Form**" along with detailed "**terms & conditions**" from our website **www.canararobeco.com** or collect from **Ms. Aynal Khan** (Tel. 022- 66585000) between 2.00 pm & 5.00 pm from Monday to Friday.
2. Offer opens today and closes on 03rd June 2022. Inspection of flats will be offered at the site on 21st May and 22nd May, 2022 between 2.00 pm & 6.00 pm. Bidders are advised to inspect/verify the property documents at our office during business hours/days with prior appointment.
3. Interested parties may submit their Bids in the prescribed "Offer Form" along with interest free Earnest Money Deposit of Rs.1,00,000/- (Rupees One Lac Only).
4. Bids will be opened on 07th June, 2022 at 3.00 p.m. in the company's office at the above address.

The company reserves its right to accept/reject any/all bids without assigning any reason whatsoever. No brokerage will be paid by the company.